बुधवार, दि २७ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक १० वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## छत्रपती संभाजीनगर ते अयोध्या बस सेवा सुरु करा - कोलते

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे छत्रपती संभाजीनगर ते अयोध्या आराम, ईलेक्ट्रीकॅल्स, शिवशाही बस सेवा सुरु करून जिल्ह्यातील भाविकांना प्रभू श्रीरामाचे दर्शनासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी स्वातंत्र सैनिक पाल्य युवक समितीचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब कोलते यांनी विभाग नियंत्रक छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

विभाग नियंत्रक यांना दिलेल्या निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हंटले आहे की, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत छत्रपती संभाजीनगर ते अयोध्या आराम, इलेक्ट्रिकल्स, शिवशाही बस सेवा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून सुरु करावी, कारण छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा धार्मिक व साधू संतांची भूमी म्हणून ओळखली जातो, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अनेक धार्मिक संस्थाचे कामे मोठ्या प्रमाणावर होत असून जिल्ह्यात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून आयोध्याला जाण्यासाठी सध्याची परिवहन व्यवस्था जास्त प्रमाणात खासगी स्वरुपाची असून सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी नाही. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर आगारातून छत्रपती संभाजीनगर ते आयोध्या आराम बस, इलेक्ट्रिकल बस व शिवशाही बस सेवा सुरु केल्यास छत्रपती संभाजीनगर आणि शेजारच्या जिल्ह्यातील भाविक पर्यटक यांच्यासाठी लाभदायी ठरेल त्याचबरोबर परिवहन महामंडळाचे उत्पन्न



वाढविण्यास मदत होईल.

निवेदनाचा व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भाविकांचा हिताचा विचार तात्काळ होऊन छत्रपती संभाजीनगर ते आयोध्या बस सेवा सुरु करावी अशी मागणी बाबासाहेब कोलते यांनी केली आहे.

## भाजपाच्या वतीने संविधान दिन साजरा




**जालना । प्रतिनिधी -** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि निर्माते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामुहिक वाचन करत संविधानाची प्रत स्वअर्पण करून संविधान दिन भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय, जालना येथे दि.(२६) रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी भाजपा जालना महानगर अध्यक्ष श्री. सतीश जाधव, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, सोपान पेंढारकर, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलीये, अर्जुन गेही, राजेंद्र भोसले, सिद्धेश्वर हजबे, रोशन चौधरी, सुभाष सले, सुदर्शन काळे, अमोल कारंजेकर, आनंद झारखंडे. उमेश पेंढारकर, शुभांगी देशपांडे, सखुबाई पणबिसरे, सोमेश काबलीये, लक्ष्मीबाई लहाने, वैशाली बनसोडे, वर्षा ठाकुर, ममता कोंड्याल, शैला निकाळजे, दत्ता जाधव, बद्रीनाथ भसांडे, नारायण वाकचौर, करण निकाळजे, सतीश केळकर, विलास कापसे, रामलाल जाधव, शाम जाधव, अभिजित अंभोरे, सतीशचंद्र प्रभू, कैलास मोहिते, राजु गवई, योगेश सामलेटी, समर्पण विजयसेनानी, राजकुमार जैन, गजेंद्र ठाकुर, विकास कदम, सागर वाहूळकर, बबन शेजूळ, गुलाब पनबिसरे यांच्यासह असंख्य भाजपा कार्यकर्ते या विजय उत्सवात सहभागी झाले होते.

## चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ वाजेनंतर भरविण्याच्या शासन निर्णयाला हरताळ

### अंमलबजावणी न झाल्यास मराठा महासंघ आंदोलन छेडणार-अरविंद देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** आधुनिक युगात बदलेल्या जीवनशैलीमुळे मनोरंजनाची विविध साधने उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थी रात्री उशीराने झोपतात व सकाळी लवकर उठतात. त्यामुळे त्यांची झोप पुरेशी होत नाही. मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर याचा नकारात्मक परिणाम होत असल्याने इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ वाजता अथवा त्यानंतर भरण्यात यावे, या सहा महिन्यापूर्वीच्या शासन निर्णयाला शाळांनी हरताळ फसला आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम तर होत आहेच; शिवाय पालकांची तारांबळ उडत आहे. शिक्षण विभागाने तात्काळ शासन निर्णयाची अंमलबजावणी करून, सकाळी ९ वाजेपूर्वी म्हणजे सात वाजेपासून वर्ग भरणाऱ्या सर्व माध्यमांच्या शाळा, शिक्षण संस्थांवर कारवाई करावी; अन्यथा मराठा महासंघाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी दिला आहे.

यासंदर्भात अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, युवक जिल्हाध्यक्ष ड. शैलेश देशमुख, कामगार आघाडीचे अंबड तालुका अध्यक्ष मोबीन बागवान, युवक कॉंग्रेसचे शहर उपाध्यक्ष संतोष जाधव, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ जोगदंड यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनांच्या शाळांमधील पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी



९ वाजता किंवा ९ नंतर भरवण्याचा निर्णय शिक्षण विभागाने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेऊन, तसा जीआरदेखील काढलेला आहे. त्यात म्हटले आहे की, सकाळी सात वाजता शाळेमुळे विद्यार्थ्यांना सहा वाजताच उठावे लागते. मुलांचा डब्बा, त्यांची तयारी यासाठी पालकांनाही कसरत करावी लागते. झोप होत नसल्याने विद्यार्थ्यांची चिडचिड होते, मानसिक आणि शारीरिक आरोग्यावरही परिणाम होतो. पावसाळा, हिवाळा, बदलेले वातावरण यांमध्ये लहान विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागते. या वातावरणमूळे लहान विद्यार्थ्यांना त्रास होतो व पालकांची देखील धावपळ होते. मुलांना तयार करणे, शाळेत वेळेत पोहचणे. थंडीच्या तसेच पावसाच्या दिवसांत विद्यार्थ्यांना बस, व्हॅन, रिक्षा या साधनानी शाळेत जावे लागते व या दिवसांमध्ये धूके मोठ्या प्रमाणात पडते व अपघात होतात. या सर्व समस्या बघून सरकारी नियम आणि सरकारी कार्यालयाच्या वेळा व राज्यातील शाळांच्या वेळा समान येणार नाही, याची काळजी घ्यावी. या सर्वांचा विचार करून व तपासून शासनने राज्यातील चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी नऊ वाजता किंवा त्यानंतर शाळांच्या सोयीनुसार भरविण्याचा निर्णय घेतलेला असताना कुणीच शासन निर्णयाची दखल घेतलेली नाही. शिक्षण तज्ज्ञ, शिक्षक आणि पालकांशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाच्या परिपत्रात नमूद आहे. राज्य सरकारचा हा निर्णय मुलांसाठी आणि पालकांसाठी अत्यंत महत्वाचा आहे. नैसर्गिक झोप पूर्ण होऊन मुलांचे लक्ष एकाग्र होण्यास आणि अभ्यासाला प्रेरणा देण्यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरणार आहे. या मुलांचे पालकही उत्तम दिनचर्या आणि निश्चित प्रवासाचा आनंद घेऊ शकतील. लहान मुलांचा सांभाळ करणाऱ्या पालकांची तारेवरची कसरत यामुळे काहीशी कमी होणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आरोग्यावर निश्चितच सकारात्मक परिणाम झालेला दिसून येईल. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हा निर्णय हातभार लावणारा असल्याने शिक्षण विभागाने तात्काळ अंमलबजावणी करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अरविंद देशमुख यांनी दिला आहे.

## परतूर पोलिसांनी घरफोडी करणाऱ्या एकाला अटक



परतूर/ प्रतिनिधी - गोपनीय माहिती चे आधारे दिनांक २५/११/२४ रोजी रात्री एक इसम नामे सोफियान महेबुब शेख रा. परतूर यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने व त्याचे इतर ३ साथीदार यांनी मिळून परतूर शहरातील एकूण ४ घरफोडी गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहेत, पैकी ३ गुन्ह्यातील त्याचे ताब्यातून १) १२०००/-□ डउऊ ढत, कुकर, मिक्सर, २) २६०००/-□ एक टॅब., ३) २५०००/-□ एक गॅस सिलिंडर आणि शेगडी. असा एकूण ६३,०००/-□ चा मुद्देमाल हस्तगत केला आहे, बाकी आरोपी आणि बाकी मुद्देमाल शोध घेणे सुरू आहे, आरोपी यांचेकडून परतूर परिसरातील इतरही गुन्हे केल्याचे शक्यता आहे. सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल साहेब,अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी दादाहरी चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली मा.पोलीस निरीक्षक एम.टी. सुरवसे पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे ,पोलीस कॉन्स्टेबल सतीश जाधव, दीपक आडे, अच्युत चव्हाण यांनी केली आहे.



**संविधान दिन...**

**फॅब रनर्स ग्रुपच्या वतीने श्री गौरक्षण पांजरापोल येथे संविधान उद्देशिका वाचतांना ग्रुपचे अध्यक्ष अर्जुन जगताप यांच्यासह पदाधिकारी डॉ. दिलीप दिवटे, डॉ. धनसिंह सुर्यवंशी, संजय रुणवाल, संजय काबरा, केशरसिंह मेहेर, संजय अंपलकर, अजय सिंगला, कैलास म्हस्के, राम हलनोर ,प्रा.कीसन जाधव, श्रीराम सर आदी.**

## संपादकीय

# देशी वृक्षांची लागवड करा

मागील काही वर्षात शहरात सिमेंटच्या जंगलाने गर्दी केली आहे. मोठमोठ्या इमारती आणि टॉवर्स उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. जितक्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली तितक्या प्रमाणात वुक्ष लागवड करण्यात आली नाही. परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा परिणाम तापमान वाढीवर झाला. तसेच बेसुमार वृक्षतोडीमुळे अनियमित पाऊस, उष्णता अशा संकटांना तोंड द्यावे लागले. यावर मात करण्यासाठी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी या मोहिमेअंतर्गत लाखो वृक्षांची लागवड केली जाते. या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक व सेवाभावी संस्था, तरुण मंडळांनी यात हिरीरीने भाग घेतला. नागरिकांनीही आपल्या घराजवळ, बागेत, शेतात मोकळ्या जागेत, माळरानावर वृक्षारोपण केले. यावर्षीही ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे. या वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करणे आवश्यक असताना ज्या परदेशी वृक्षांची आपल्याला आवश्यकता नाही ; त्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हे ही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बुंद्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखी सरास् दिसणारे पक्षी दिसेनासे झाली आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्षांद्वारे होणाऱ्या बिजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या आस्तित्वशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. विदेशी वृक्ष पुरेसा ऑक्सीजनही देत नाहीत. देशी वृक्ष जितका ऑक्सीजन देतात तितका ऑक्सीजन विदेशी वृक्ष देत नाहीत. काही देशी वृक्ष तर चोवीस तास ऑक्सीजन देतात. वातावरणातील ऑक्सीजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीतजास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.

**श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे, ९९२२५४६२९५**

# जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राज्यघटनेचा राष्ट्रीय गौरव म्हणजे संविधान दिन

विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर गांच्या अलौकिक आणि अद्वितीय प्रकांड पांडित्यातून उदयास आलेला भारत देशासह देशातील तमाम जनतेचा राष्ट्रीय ग्रंथ म्हणजे भारतीय संविधान होय. भारतीय संविधान लिहण्यासाठी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तब्बल दोन वर्षे अकरा महिने आणि अठरा दिवस एवढा कालावधी लागला.

या प्रदीर्घ कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः च्या प्रकृतीची पर्वा न करता अहोरात्र निरंतर अभ्यास, चिंतन,मनन करत जगातील सर्व लोकशाही राष्ट्रांच्या संविधानांचा अत्यंत बारकाईने अभ्यास केला. जगातील सर्व प्रगत राष्ट्रांच्या संविधानांपेक्षा भारतीय संविधान हे जास्तीत जास्त कसे लोककल्याणकारी निर्माण करता येईल या करिता महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कायम राष्ट्रहित नजरेसमोर ठेवून निरंतर प्रामाणिक प्रयत्न केला. आणि जगातील सर्व श्रेष्ठ आणि जगातील प्रगत राष्ट्रांच्या अस्तित्वात असलेल्या सर्व संविधानांच्या तुलनेत सर्वात मोठ्या लिखित भारतीय संविधानाची निर्मिती केली. हे राष्ट्रहिताचे महान लेखन कार्य अविश्रांतपणे परिपूर्ण करून सदर संविधान घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते देशाला अर्पण केले तो ऐतिहासिक दिवस म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी हे भारतीय संविधान राष्ट्रहितासाठी सर्वानुमते अंगिकृत करून अधिनियमित केले. यानंतर घटना समितीने एका जाहीर कार्यक्रमाचे आयोजन करून त्या जाहीर कार्यक्रमात घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, स्वतंत्र भारताचे पहिले प्रधान मंत्री पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्यासह अनेक मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या असामान्य आणि अलौकिक संविधान निर्माण कार्याची प्रशंसा करून त्यांच्या प्रखर राष्ट्र प्रेम आणि जाज्वल्य देशभकीचा गौरव केला आणि २६ जानेवारी १९५० पासून हे संविधान भारतीय शासन प्रशासनात प्रत्यक्षपणे अंमलात आले.

न्याय, समता, स्वातंत्र आणि विश्व बंधुत्व या चतुः सुत्रीवर आधारित भारतीय संविधानाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता आणि बंधुता प्रवर्धीत होण्यासाठी देशातील सर्व सामान्य जनतेत, विद्यार्थी व शिक्षक वर्गात, लोकप्रतिनिधी आणि सरकारी निमसरकारी प्रशासकीय अधिकारी, लोकसेवक यांच्या मध्ये सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक आणि राजकीय स्तरावर संविधान साक्षरता व जाणिव जागृती होणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे शैक्षणिक अभ्यासक्रमात भारतीय संविधानाचा अंतर्भाव केला पाहिजे.

या संविधान गौरव दिनानिमित्ताने भारतीय संविधानातील मौलिक तत्वे, संविधानिक हक्क, अधिकार आणि कर्तव्य स्वतंत्र भारताच्या नागरिकांना संस्कारित करणार आहेत. हीच संविधानिक तत्वे शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या जीवनात आणि विद्यार्थी मनावर बिंबवून त्यांना देशाचे सुजाण व जागरूक नागरिक भडवणे आवश्यक आहे. त्याच बरोबर आपल्या भारतीय संविधानाच्या अधीन राहून भारताचा प्रशासकीय कारभार चालतो याची जाणीव, जागृती विद्यार्थ्यांना आणि भारतीय नागरिकांना झाली पाहिजे. आपल्या देशाच्या या घटपात्मक संसदीय लोकशाहीच्या आधारे कार्य पालिका, न्याय पालिका, संसद, मंत्रीमंडळ, निवडणूक आयोग, प्रसार माध्यमे यांच्या दैनंदिन कारभाराचे समग्र ज्ञान विद्याथ्यांना आणि नागरिकांना व्हाने



या करिता शासनाने सन २००८ ला अध्यादेश काढून २६ नोव्हेंबर रोजी देशासह राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, केंद्रीय मनुष्य विकास मंत्रालम, विद्यापीठ अनुदान आयोग तथा युजीशी, मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये, महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समित्या, ग्राम पंचायत कार्यालयात संविधान गौरव दिन आगोजित करून या दिनाचे महत्व विशद करण्यासाठी वकृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन आणि भारतीय संविधानाच्या प्रास्तविकेचे सामुहिक वाचन करने सर्वांना बंधनकारक केले आहे. या संबंधीचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांव्याकडे पाच डिसेंबराच्या आत सविस्तर सादर करावयाचे आहे. संबंधित जिल्हाधिकारी महोदयांनी आपल्या जिल्यात प्रत्यक्ष किती ठिकाणी शासकीय आदेशाची अंमलबजावणी केली आहे, हे गांभीर्याने पहायचे आहे. अशा सुचना आहेत.

भारतीय संविधान हा आपल्या राष्ट्राचा तथा भारतीयांचा एकमेव राष्ट्रीय ग्रंथ आहे. या संविधानाच्या माध्यमातून आपण जगातील सर्वश्रेष्ठ संसदीय लोकशाही स्वीकारली आहे. त्यामुळे ती अत्यंत निस्वार्थी वृत्तीने व पारदर्शकपणे राबविणे आणि तिचे पालन करणे जसे प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी वर्गाची जबाबदारी आहे, तशीच ती सर्व भारतीम नागरिकांची सुद्धा तितकीच नैतिक जबाबदारी आणि आपले राष्ट्रीय कर्तव्यच आहे.

**विश्वास बळीराम गायकवाड**
**बोरपर- माणगाव, रायगड.**
**संपर्क - ९८२२५८०२३२, ८००७२५००१२**

# गायत्री आंबेकर हिने मेहनतीच्या बळावर ब्लॅक बेल्ट मिळविला

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानात गेल्या २७, वर्षापासून कराटे क्लास चे प्रशिक्षण दिले जात आहे. मुलींना स्वतः चे रक्षण स्वतः करण्यासाठी स्वावलंबी होण्याची गरज आहे.कुठल्याही क्षेत्रात मुली कमी नाहीत. कराटेसाख्या क्रीडा प्रकारातून मुलींना स्वरक्षणासह करिअरच्या अनेक संधीदेखील उपलब्ध आहेत.विशेषतः ग्रामीण भागातील मुलींनी कराटे सारख्या क्रीडा प्रकारात रस घेणे काळाची गरज असल्याचे मत डॉ. सुधीर आंबेकर यांनी व्यक्त केले.परतूर येथे सोतोकान कराटे डो इंडिया मुंबई च्या वतीने ब्लॅक बेल्ट टेस्ट घेण्यात आली होती. या ब्लॅक बेल्ट टेस्ट मध्ये गायत्री आंबेकर हिने आपल्या मेहनतीच्या बळावर ब्लॅक बेल्ट व प्रमाणपत्र प्राप्त केले.यावेळी गायत्री आंबेकर हिला ब्लॅक बेल्ट व प्रमाणपत्र कराटे मास्टर माणिक जैस्वाल यांच्या हस्ते देण्यात आले. जैस्वाल यांनी खूप आपुलकीने व शिस्तीत परतूर येथील अनेक मुलींना कराटे प्रशिक्षण देवून आत्मनिर्भर केले आहे.म्हनुन आज मुंबई, नाशिक, नागपूर, संभाजीनगर, पुणे, या सारख्या ठिकाणी मुली शिक्षणासाठी जातात पण त्यांचे पालक कशाचा पण विचार न करता बिन्धास्त राहतात.गायत्री आंबेकर



हिने आपले कराटे प्रशिक्षण मागील दोन वर्षांपूर्वी पूर्ण केले होते.परंतू तीला शिक्षणासाठी पूणे येथे गेल्या मुळे बेल्ट व प्रमाणपत्र घेणे शक्य झाले नाही. म्हनुन आज रोजी गायत्री सुधीर आंबेकर हिला ब्लॅक बेल्ट, प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.यामुळे परतूर येथील डॉ. नंद. डॉ.तापडीया व प्रतिष्ठित नागरिक यांनी अभिनंदन केले आहे.

# लाकडाची अवैध वाहतूक; आयशर वन विभागाने पकडला

## सात लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना -** लाकडाची अवैध वाहतूक करणारा आयशर जालन्यातील वन विभागाच्या पथकाने पकडलाय. या कारवाईत आयशर वाहनासह साडे सात लाखांचा मुद्देमाल वनविभागाच्या पथकाने जप्त केलाय. दिनांक २५ सोमवार रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास जालना - मंठा महामार्गावर ही कारवाई करण्यात आलीय. लाकडाची विना परवाना अवैध वाहतूक आयशर गाडीतून होणार असल्याची माहिती जालना येथील वनपरिक्षेत्र विभागाच्या पथकाला मिळाली होती. त्या माहितीवरून वन विभागाच्या पथकाने जालना - मंठा महामार्गावरील रामनगर साखर कारखाना टोल नाका परिसरात सापळा लावला. यावेळी वन विभागाच्या पथकाला आयशर गाडी क्रं. चक ३८ ०३५३ येताना दिसली. वन विभागाच्या पथकाने आयशर गाडीच्या चालकाला गाडी थांबवून वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये लिंब, बोर, हिवर, पळसचे अवैध वृक्षतोड करून वाहतूक करीत असल्याचे वन विभागाच्या पथकाला आढळून आले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# जे ई एस महाविद्यालयात संविधान दिना निमित्त विद्यार्थ्यांना शपथ



**जालना । प्रतिनिधी -** जे ई एस महाविद्यालय जालना येथे भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त विद्यार्थी-विद्यार्थिनींना भारतीय संविधानाची शपथ देण्यात आली. आजच्या युवा पिढीमध्ये धर्मनिरपेक्षता ,सामाजिक आर्थिक राजनीतिक न्याय विचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, देशभक्ती, समता, बंधुता ,राष्ट्रीय एकात्मता यासारख्या मूल्यांसाठी युवा पिढीला शपथ देणे आवश्यक आहे, हे या कार्यक्रमाचे मुख्य प्रयोजन असल्याचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. वसंत पवार यांनी सांगितले.

यावेळी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री ,उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, परिवेक्षिका प्रा. करुणा वासनिक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. वसंत पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र सोनवणे व प्रा. किशोर तापडिया, एनसीसी अधिकारी डॉ.फुलचंद मोहिते,प्रा. सतीश लोंढे ,प्रा. प्रवीण वाघमारे, प्रा. अनिल घात्रे, विद्यार्थी - विद्यार्थिनी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच यावेळी म ुंबईवरील २६/११ च्या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



**संविधान दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना शिवसेना दलित आघाडी जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांच्यासह तालुकाध्यक्ष जय खरात, बंटी बडगे, अजय भालेराव, विवेक भुमरे, अनिल खरात, अमोल कटारिया, शिवराज खरात, सतीश फत्तपुरे, अनिल मस्के आदी.**

# भारताच्या लोकशाहीत संविधान अत्यंत महत्त्वाचे - विष्णू जाधव



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जेबीके विद्यालय येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधान दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप मुख्याध्यापक पंजाबराव सोळंके होते. संचालक तथा उपराचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, पर्यवेक्षक धनंजय पुराने होते. या कार्यक्रमात इतिहास शिक्षक श्री विष्णू जाधव यांनी मनोगत व्यक्त करताना संविधानाचे महत्त्व सांगितले. हे सांगताना त्यांनी लोकशाहीमध्ये संविधान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहिताना धर्मनिरपेक्ष समाज डोळ्यासमोर ठेवला. संविधानाची कलम संविधानाचे परिशिष्टे या संदर्भात विस्तृत माहिती सांगितली. याप्रसंगी सर्वप्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन झाले. याप्रसंगी २६ /११/ २००८ झालेल्या हल्ल्यातील मृतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी सखाराम बोरकर, भिवसान ससाणे, रमेश इंगळे, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापकअरुण आहेर,प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक कैलास जाधव, गजानन धोटे, संजय कुलकर्णी, वासुदेव क्षीरसागर, समाधान कांबळे, राजेश शेवाळे, दत्ता उखर्डे, राजेंद्र जगताप, रवींद्र मोरे, गणेश सावंसके, आवटी मॅडम, भिलावेकर मॅडम, पाटील मॅडम, कळंबे मॅडम, लंबे मॅडम, राजू डोंबळे, नागोराव देशमुख,दगडोबा तांबेकर, दीपक देशमुख आदींची उपस्थिती होती.

# लॉयन्सतर्फे दानकुंवर कन्या विद्यालयात पाचशे विद्यार्थिनींची मोफत नेत्र तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे क्लबच्या अध्यक्षा सौ. जयश्री लड्डा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शहरातील शोला चौकातील दानकुंवर कन्या विद्यालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. त्यात ५०० मुलींची नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान अनेक मुलींमध्ये दृष्टीदोष आढळून आल्याने त्यांच्या पालकांना याबाबत माहिती देण्यात आली.

सध्या टीव्ही व मोबाईलच्या अतिवापरामुळे लहान मुला-मुलींमध्ये दृष्टीदोष वाढताना दिसत आहे. या शिबिराद्वारे या गंभीर समस्येकडे पालकांचे लक्ष वेधण्यात आले. लायन्स दृष्टीरक्षकचे डॉ. योगेश व त्यांच्या टीमने पाचशे मुलींची नेत्रतपासणी केली. प्रत्येक मुलीला तपासणीनंतर पौष्टिक शेंगदाणापट्टी देण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा कोल्हे व शिक्षकांनी या प्रकल्पासाठी महत्त्वपूर्ण सहकार्य केले. याप्रसंगी लायन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्डा, सचिव मंजू श्रीमाली, प्रकल्प प्रमुख वंदना मुंदडा, अतुल लड्डा आणि सदस्यांसह पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# न्यू इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेजमध्ये संविधान दिन उत्साहात



**मंठा । प्रतिनिधी -** डॉ.बि.बि.प्रधान सर सम्यक प्रबोधन संघ संस्थापक अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली न्यु इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज मंठा येथे संविधान दिन साजरा करण्यात आला यावेळी शाळेचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. उध्दव मोरे सर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली यावेळी संविधान तयार करण्यासाठी २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस लागले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी पूर्ण होऊन त्याचा स्वीकार करण्यात आला. यानंतर, १ वर्षानी म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना लागू करण्यात आली. २०१५ मध्ये भारत सरकारने २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्याचो निर्णय घेतला होता. अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली.यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची वेशभूषा परिधान करून त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला तर भाषणे,व गित गायन करून उपस्थितांचे मने जिंकली.या वेळी विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती राठोड मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन सिमा निर्वळ यांनी मानले यावेळी परमेश्वर चव्हाण,राम जाधव,अर्चना राठोड,रंगारी मॅडम,भारती गुज्जर,खरात मॅडम,राजेश मोरे,अजय कदम ,राम चव्हाण शिवाजी पौळ व शाळेचे सर्व कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

**झाडे लावा झाडे जगवा**

# कायदेविषयक तथा विधी साक्षरता शिबिराचे सरस्वती प्राथमिक विद्यालयात संपन्न

## विद्यार्थ्यांना दिली लैंगिक अत्याचार कायदा २०१२ ची माहिती




**अंबड । प्रतिनिधी -** प्रतिनीधी) अंबड शहरातील सरस्वती प्राथमिक विद्यालय येथे बालक दिनानिमित्त शिबिर घेण्यात आले होते. अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती अंबड तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री न्या.एस.बी.गायधनी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

१४ नोव्हेंबर २०२४ बालक दिनानिमित्त कायदेविषयक तथा विधी साक्षरता शिबिराचे सरस्वती प्राथमिक विद्यालय अंबड शाळेत आयोजन करण्यात आले. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना लैंगिक अत्याचार कायदा २०१२ याविषयी माहिती देऊन शिक्षण किती महत्त्वाचे आहे, याविषयी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे ड गायकवाड मॅडम, ड. प्रज्ञा बागुल मॅडम, श्री रामभाऊ लांडे सर ,ढोले मॅडम , विधी स्वयंसेवक नाजीम सय्यद सर, खोरे सर, प्रशांत बागुल सर यांची उपस्थिती होती. वरील सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री आदित्यजी पवार सर यांनी व सर्व शिक्षक वृंदांनी केले.व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक श्री इंगळे सर यांनी केले. याप्रसंगी ड गायकवाड मॅडम यांनी लहान मुलांवर होणाऱ्या अत्याचाराविषयी मार्गदर्शन केले. तसेच लैंगिक अत्याचार व छळ याविषयी माहिती दिली व चांगला स्पर्श व वाईट स्पर्श याविषयी माहिती दिली तसेच ड.प्रज्ञा बागुल मॅडम यांनी १४ नोव्हेंबर २०२४ बालदिनाविषयी माहिती सांगून, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत ६ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण याविषयी माहिती देऊन कवितेच्या माध्यम ातून शिक्षणाचे महत्त्व व जागृती करण्यात आली. त्याचबरोबर श्री. रामभाऊ लांडे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा संदर्भ देऊन निर्भीडपणाचे धडे दिले. अधिकाराची जाणीव करून दिली. शिक्षणाविषयी माहिती दिली. त्याचबरोबर, ढोले मॅडम यांनी तालुका विधी सेवा समि ती विषयी विद्यार्थ्यांना सखोल अशी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये श्री प्रशासकीय प्रमुख श्री आदित्य पवार सर यांनी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले व कार्यक्रम च्या शेवटी आभार प्रदर्शन श्री परमानंद पवार सर यांनी व्यक्त करून कार्यक्रम संपला अशा जाहीर केले. या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित शाळेतील सहशिक्षक श्री.अतुल शिंदे सर, श्री.युवराज इंगळे सर, श्री.गणेश झाडे सर, श्री. निलेश हमने सर, कु. रेणुका चव्हाण मॅडम, सौ. काळे मॅडम व विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीराम वाचनालयात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन



**जालना-** महाराष्ट्र शासनच्या आदेशानुसार भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्ताने जालना येथील ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय येथे दिनांक-२६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११.00 वाजता भारतीय संविधानाच्या प्रास्ताविक/ उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून संविधान लोकशिक्षण अभियानाचे संचालक मिलिंद सावंत, जीवन ज्योति फाऊंडेशनचे संचालक प्रल्हाद ढवळे यांची उपस्थिती होती. मिलिंद सांवत मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचा सर्व समावेशक अशी राज्यघटना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगांवकर यांनी केले. याप्रसंगी महेंद्र होलानी, वैभव गरदास, रामकृष्ण खैरे, शेख अकबर, अलीम शेख, विजय खिल्लारे, ओम आहेर, शैलेंद्र बदनापूरकर यासह वाचक वर्ग उपस्थित होता.

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

